भंडारा जिल्हा पोलीस वार्तापत्र

(सकाळ)

जा.क्र. ६७५/माहिती कक्ष/वार्तापत्र
पोलीस अधीक्षक कार्यालय, भंडारा
दिनांक २९/०९/२०१७

**१) संगनमत करुन शासनाचे नियमांचे उल्लघंन करुन अवैद्यरित्या रेतीची चोरी करतांनी मिळुन आल्याने गुन्हा नोंद :—**

दिनांक २८/०९/२०१७ चे ०.२.०० वाजता दरम्यान यातील आरोपीतांनी संगनमत करून शासनाचे नियमाचे उल्लंघन करून सुर्यास्ता नंतर व सुर्योदयापुर्वी अवैध रेती उत्खनन करून १) शेंद्री रंगाची पोकलॅन्ड मशिन ईएक्स २०० एनसी २००१—५८८५ किमती. अंदाजे २५,००००० /रु २) शेन्द्री रंगाची पोकलॅन्ड मशिन इएक्स २ एलसी सुपर एस २००—२०८४८ किंमती. अंदाजे २५,००००० /रु व ३.२०० ब्रास रेतीचे ३ ढिग किंमती. अंदाजे ३,४०,००० /रु ४) १ टिप्पर क्र. एमएच ३६/१२५४ ज्यात रेती भरलेली कि. अंदाजे १५,०६,००० /रु चे रिकामे टिप्पर क्र. एमएच ०७ एक्यु ४४२५ कि. अंदाजे १५,००००० /रु ६) रिकामे टिप्पर क्र. एमएच ३६ एफ ४४५७ कि. १४,००००० /रु ७) रिकामे टिप्पर क्र. एमएच ३६ एफ ५४३५ किंमती १६,००,००० /—रु. ८) रिकामे टिप्पर क्र. एमएच ३१ सीव्ही ३०३३ किंमती ६,००,००० /—रु. ९) रिकामे टिप्पर क्र. एमएच ४० एके ३५५१ किंमती १५,००,००० / रु. सीव्ही ३०३३ किंमती ६,००,००० /—रु. १०) रिकामे टिप्पर क्र. एमएच ४० बीसी १६१९ किंमती १६,००,००० / रु. ११) रिकामे टिप्पर क्र. एके ४५९१ किंमती १४,००,००० /—रु. ४० बीसी १६१९ किंमती १६,००,००० / रु. १२) रिकामे टिप्पर क्र. एमएच ३६ एफ १६८७ किंमती १४,००,००० /—रु. १३) रिकामे ट्रक क्र. एमएच ३६ एल ०८६५ किंमती ५,००,००० /—रु. १४) डस्टर कार क्र. एमएच ३६ ६६११ किंमती ६,००,००० /—रु. असा एकुण १,८९,४६,००० /—रु. पोकलन्ड मशीनने भरुन रेती चोरुन नेतांनी मिळुन आल्याने पोलीस स्टेशन तुमसर येथे कलम ३७९,३४ भांदवि. अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला. पुढील पोउपनी. हावरे पो.स्टे तुमसर हे करीत आहेत. आरोपी अटक आहेत.

**२) तरुणीवर अत्याचार करुन विनयभंग केल्याने गुन्हा नोंद :—**

दिनांक २८/०९/२०१७ चे ०६.३० वाजता दरम्यान यातील आरोपीने फिर्यादीला नौकरी लावुन देतो म्हणुन ५०,००० /—रु. घेतले व शाळा दाखवतो म्हणुन स्वतःचे ॲक्टीव्हा गाडी ने टेकेपार जंगलात नेवुन बलत्कार करण्याचे उद्येशाने नेवुन कपडे फाडुन अती प्रसंग करुन विनयभंग केल्याने फिर्यादी यांचे तोंडी रिपोर्ट वरून पोलीस स्टेशन अडयाळ येथे कलम ३५४(अ)(२),३७६,५११ भांदवि. अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला. पुढील तपास सपोनी. किचक पो.स्टे अडयाळ हे करीत आहेत.

**३) बिनापास परवाना निदर्यतेने जनावराने कोंबुन वाहतुक करतांनी मिळुन आल्याने गुन्हा नोंद :—**

दिनांक २८/०९/२०१७ चे ०३.०० वाजता दरम्यान यातील फिर्यादी नरसिंह विश्वनाथजी गोमासे वय २७ वर्ष, रा. खरबी हा व त्याचे बजरंग दलाचे कार्यकर्त्यानी मिळालेल्या गोपनीय माहिती वरुन फिर्यादी हे कार्यकर्त्यासह शिवनी येथील जंगल शिवारात गेले असता त्यांना येथील आरोपीतांनी त्याचे ताब्यातील १) ट्रक क्र. टीएस ओ ०१ ही एस ७४७७ २) ट्रक क्र. एमएच २० डीई. ७६१७ या ट्रक मध्ये एकुण ९० बैल किंमती २,७०,००० /—रु. चे बिनापास परवाना निदर्यतेने कोंबुन डांबुन वाहतुक करतांनी मिळुन आल्याने फिर्यादी व कार्यकर्त्यानी नमुद ट्रक जनावरासह पोस्टेला आणुन फिर्यादीचे तोंडी रिपोर्ट वरून पोलीस स्टेशन आंधळगाव येथे कलम ११(१)(घ) प्रा.कृ.वा.प्र. कायदा. अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला. पुढील तपास पोउपनी. म्हैसकर पो. स्टे आंधळगाव हे करीत आहेत.

**४) संगनमत करुन क्षुल्लक कारणावरुन भांडण व शिवीगाळ करुन रोडवर आपटुन जखमी केल्याने व जिवाने मारण्याची धमकी दिल्याने गुन्हा नोंद :—**

दिनांक २७/०९/२०१७ चे १९.०० वाजता दरम्यान यातील फिर्यादी राजु श्रीराम गोपुलपुरे वय ३८ वर्ष, रा. जाम याचा मुलगा प्रवीण वय १८ वर्ष, हा आपले मोटार सायकलने गावात जात असता यातील आरोपी क्र. १ व २ हे रोडवर उभे असतांना मोटार सायकलचे हार्न देवुन बाजुला होण्यास म्हटल्यावर आरोपीतांनी त्यास शिवीगाळ करुन थापडांनी मारपीट करीत असता फिर्यादीने 'माझे मुलाला कश्याला मारपीट करता' असे बोलले असता आरोपीतांनी संगनमत करुन फिर्यादीस उचलुन रोडावर आपटुन कपाडावर जखम झाल्याने व लाथा बुक्यांनी मारपीट शिवीगाळ करुन जिवाने मारण्याची धमकी दिल्याने फिर्यादीचे तोंडी व डॉक्टरी परीक्षण रिपोर्ट वरून पोलीस स्टेशन आंधळगाव येथे कलम ३२४,५०४,५०६,३४ भांदवि. अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला. पुढील तपास पोउपनी. म्हैसकर पो.स्टे आंधळगाव हे करीत आहेत.

**५) पर्समधुन मोबाईलची चोरी :—**

दिनांक २८/०९/२०१७ चें ०८.१५ ते ९.३० वाजता दरम्यान यातील फिर्यादी सौ. सुनीता नितीन तोडकर वय ४० वर्ष, रा. गोवर्धन नगर तुमसर ही गजानन रंभाड विद्यालय नरसिंगटोला येथे स्टॉप रुमचे आलमारीवर हॅन्ड पर्स मध्ये ठेवलेला एक जिवोनी कंपनीचा मोबाईल किंमती ६,६००/—रु. कोणीतरी अज्ञात चोराने चोरुन नेल्याने फिर्यादीचे लेखी रिपोर्ट वरून पोलीस स्टेशन करडी येथे कलम ३७९ भांदवि. अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला. पुढील तपास पोहवा. सलामे पो.स्टे करडी हे करीत आहेत.

**६) अवैध दारू /जुगार अडयावर धाडी . :—**

दिनांक २८/०९/२०१७ रोजी भंडारा जिल्हा पोलीसांनी पो.स्टे. जवाहरनगर, मोहाडी, कारधा, तुमसर, भंडारा, गोबरवाही, लाखांदुर, दिघोरी येथे अवैध दारू/जुगार अडयावर धाडी घालुन एकुण १२ गुन्हे दाखल करून १३१ लिटर हा.भ. दारू किंमती ९,४२५/—रु, व ३१ लिटर २२० मिली लिटर विदेशी+देशी दारू+मोटार सायकल किंमती १,५३,९००/—रु. तसेच जुगारातुन किमती ४५५/रु असा एकुण किंमती १,६३,७८०/—रु. चा माल जप्त करण्यात आला.

(एस. व्ही. कुलकर्णी )
**पोलीस उपअधिक्षक (गृह)**
**भंडारा**
**दुरध्वनी.क्र. ९९८७३८५४०५**

प्रति,

**जिल्हा माहिती अधिकारी, भंडारा**

वर्तमान पत्राचे संपादक व जिल्हा प्रतिनिधी यांना उपरोक्त माहीती दैनिक वर्तमान पत्रात प्रसिध्द करण्याकरीता कळविण्यास विनंती आहे.

**प्रत, संगणक कक्ष,** भंडारा यांना भंडारा पोलीस संकेतस्थळावर ठेवण्याकरीता